Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 708 – 711

DOI: 10.5281/zenodo.10279332

Original Research Article

# महात्मा गांधीजी आणि आहिंसा

प्रा. डॉ. धम्मानंद श्रीरंग गायकवाड

विभाग प्रमुख, पाली विभाग, रामदास आठवले महाविद्यालय, निलंगा जि. लातुर महाराष्ट्र

*Corresponding author E-mail*: gaikwaddhamma1986@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजी म्हटलं की सत्याग्रह , महात्मा गांधीजी म्हटल कि भारतीय स्वातंत्र्याचे जननायक ,अहिंसेचे खंदे पुरस्कर्ते आशा अनेक नावांनी, उपाध्यांनी त्यांना जगभरात ओळखले जाते. महात्मा गांधीजींचे व्यक्तिमत्व घडवण्यामध्ये ज्या घटकाचा हातभार आपल्याला दिसुन येतो, ते म्हणजे “सत्याग्रह”. त्यांनी सत्याग्रह म्हणून जी काही आंदोलने उभी केली त्यात त्यांनी वेगवेगळया साधनांचा वापर केला. ‘अहिंसा’ त्यातील एक प्रभावी साधन म्हणून गांधीजींनी याचा वेळोवेळी म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह असो कि भारतीय स्वातंत्र्य आंदोलन असो, उपयोग केलेला दिसून येतो. तसे पाहता अहिंसा हि फार प्राचीन काळापासून भारतीय ज्ञान परंपरेतील एक महत्वाचा घटक राहिली आहे. ठळक स्वरुपात प्राचीन काळातील अहिंसेचे पुरस्कर्ते सांगत असतांना आपण वर्धमान महावीर, तथागत बुद्ध, महान सम्राट अशोक अशी खूप मोठी यादी देता येईल, परंतु वर उल्लेख केलेल्या विभूतींनी ज्या पद्धतीने अहिंसेचे समर्थन केले तशी क्वचित उदाहरणे पाहायला मिळतील. बौद्ध धर्म जो कि तथागत बुद्धांच्या विचारातून तयार होऊन स्वतः हि जागा आणि दुसऱ्यालाही जगू द्या या मध्यम विचार संकल्पनेवर विकास पावला आणि या भारत भूमीमध्ये जवळ जवळ १६०० वर्ष जन सामान्यांचा धर्म म्हणून प्रचलित होता आणि आज हि आहे . म्हणून महात्मा गांधीजींना हे साधन त्यांच्या जन्म भूमीतून मिळाले असल्यामुळे त्यांना याचा उपयोग करतांना कसलीही अडचण आली नाही, वाटली नाही.

**संशोधनाचा उद्देश**

१. महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.
२. ‘अहिंसा’ हि संकल्पांना भारतीय संस्कृतीच्या दृष्टीकोनातून अभ्यासणे.
३. ‘अहिंसा’ अन्याया विरुद्ध कशाप्रकारे उपयोगात आणता येईल, याचा अभ्यास करणे.

**संशोधनाच्या मर्यादा**

प्रस्तुत शोध निबंध तयार करण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. यात संबंधित पुस्तके, मासिके, वर्तमान पत्रातील आग्रलेख व इंटरनेट वरील माहिती आदींचा वापर करण्यात आला आहे. अहिंसा हि संकल्पांना

पूर्णतः मानव केंद्रित असल्यामुळे या शोधनिबंधात पूर्णतः विषयाला न्याय देऊ असे होणार नाही. म्हणजेच काही पैलू तसेच मागे शिल्लक राहण्याची दाट शक्यता आहे. म्हणून हि या शोध निबंधाची मर्यादा सांगता येईल.

**अहिंसा**

'हिंसेचे मुळ क्रोध, स्वार्थीपणा, वासना इत्यादी विनाशक प्रवृत्तीमध्ये आहे असे तथागत बुद्ध म्हणतात'१. त्यामुळे हिंसेच्या माध्यमातून सत्य प्राप्तीच्या ध्येयापर्यंत पोंचले जाऊ शकत नाही. 'जे लोक अहिंसक आहेत, जे सदा शरीराने संयमित आहेत, ते या जगतातून कधीच च्युत होत नाहीत तर विचार रुपी जगात अस्तित्वात असतात'.२ अहिंसेचा शुद्ध अर्थ प्रेम, मैत्री आहे. सत्याचा देखील हाच अर्थ आहे. अहिंसा प्रेमाचा परिणाम आहे. म्हणजेच प्रेमाची, मैत्रीची आवस्थाच सुखमय असू शकते. तथागत बुद्ध म्हणतात अहिंसा हे एखाद्या विशिष्ट प्रसंगीच, एखद्या विशिष्ट घटक किंवा वर्ण यांच्या बाबतीतच उपयोगात आणण्याचे तत्व किंवा सद्‌गुण आहे असे नाही. अहिंसा ही आपल्या जीवनाचा अविभाज्य अंग बनली पाहिजे. आपल्या मनातून क्रोध पार मुळासकट निघून गेला पाहिजे. क्रोध, राग हिंसेला जन्म देतात. त्यामुळे क्रोध पूर्णतः नष्ट करण्याचा मार्ग बुद्ध सांगतांना दिसतात. त्याच प्रमाणे वर्धमान महावीर देखील अहिंसेवर जोर देतात. गांधीजी म्हणतात,"अहिंसा ती ज्योत दृष्टी आहे ज्यामुळे मला सत्याचे दर्शन होते.३ गांधीजी सत्याची अनुभूती अहिंसेतूनच शक्य आहे असे मानतात. अहिंसा सत्याचा प्राण आहे. सत्यासाठी आत्मशुद्धीद्वारे मिळविलेला आत्मबोध आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अहिंसेला अकल्याणाचा अभाव मानतात. ही भावना शुद्ध प्रेमातच असू शकते. अहिंसा निषेध आहे हिंसेचा. हिंसा एक कर्म आहे. ज्याचा परिणाम त्रासदायक, वेदनादायी आणि इतरांच्या अकल्याणाचा आहे. अशा प्रकारे हिंसा एकंदरीत तोट्याच्या रूपात व्यक्त होते. 'अहिंसा सत्याचे दर्शन करण्याचा सरळ आणि छोटासा मार्ग आहे.' ४ 'अहिंसा साध्य नाही, साध्य सत्य आहे. परंतू आपण सत्याचे दर्शन फक्त अहिंसेचे पालन करून करू शकतो'.५ गांधीजींच्या मते, फक्त दया भावनेचा अभाव नाही, तर वाईट विचार देखील हिंसा आहे. उतावळी हिंसा, खोटे बोलणे हिंसा आहे, कोणाविषयी वाईट चिंतणे हिंसा आहे. या सर्वांपासून दूर होणे अहिंसा आहे. गांधीजी हिंसेपासून दूर राहण्यासाठी ब्रम्हचर्य, अस्वाद, अस्तेय, अपरिग्रह, अस्पृश्यता निवारण इत्यादींचे व्रत करणे आवश्यक मानतात. ते असे देखील मानतात की, त्यांच्या शिवाय अहिंसा प्रस्थापित होऊ शकत नाही. बौद्ध धम्मात आणि जैन धर्मात महात्मा गांधी ज्या बाबी अहिंसेसाठी आवश्यक आहेत असे सांगतात, त्या त्यांच्यापेक्षा हि अतिशय बरीकीने सांगण्यात आल्या आहेत . शोध निबंध विस्तार भयास्तव या टिकाणी त्या देता येणार नाहीत.

पूर्ण अहिंसेचा अर्थ आहे 'प्राणीमात्रासाठी वाईट भावनेचा पूर्ण अभाव, अहिंसा एक पूर्ण स्थिती आहे. संपूर्ण मानवजात याच एका ध्येयाकडे स्वाभाविकपणे परंतू अजाणतेपणे जाणे आवश्यक आहे.' सर्वांचे मुळ एकच आहे. आपल्या अंत:करणात क्रोधाची भावना उत्पन्न होणे किंवा तिला थारा मिळणे जेव्हा अशक्य होईल तेंव्हाच हिंसा टाकून दिली असल्याचा दावा आपल्याला सांगता येईल, किंवा अखेरपर्यंत आपण अहिंसक राहू अशी अपेक्षा बाळगता येईल. बुद्ध म्हणतात, 'करुणा आणि मैत्री या दोहोशी तिचा जिव्हाळयाचा संबंध आहे'.६

'अहिंसा' या शब्दा करिता इंग्रजीत 'नॉन –व्हायोलन्स' हा शब्द उपयोगात आणला जातो. परंतु तो तोडका वाटतो. या शब्दा ऐवजी किंवा अधिक समर्पक शब्द म्हणून आपण प्रेम , मैत्री यांचा वापर करायला हवा. 'सत्यातून अहिंसेची उत्पत्ती किंवा सत्य आणि अहिंसेची जोडी मानू शकतो. दोन्ही वस्तू एकच आहे. तरी देखील माझे पाहणे पहिल्याकडे झुकते. शेवटची स्थिती जोडीमध्ये द्वंद्वच आहे भूतकाळ आहे. श्रेष्ठ सत्य एकटे कायम असते. सत्य साध्य आहे. अहिंसा साधन आहे. अहिंसा आपल्याला माहित आहे. जरी पालन करणे कठीण आहे. तसेच जसे की शरीरासाठी अहिंसेचे पूर्ण पालन'.७ अहिंसेशिवाय सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा आणि सत्य असे आहेत की, एकाच नाण्याच्या दोन बाजू यामध्ये कोणाला उलटे म्हणावे, कोणाला सरळ ? तरी देखील अहिंसेला साधन आणि सत्याला साध्य मानले पाहिजे. साधन आपल्या हातातील गोष्ट आहे. यामध्ये अहिंसा श्रेष्ठ धर्म मानली गेली आहे. सत्य परमेश्वर झाला. साधनांची चिंता करत राहिल्यावर साध्याचे दर्शन एखाद्या दिवशी करूनच घेऊ एवढा निश्चय करणे जग जिंकणे आहे. आपल्या मार्गात भले

कितीही संकटे येवोत, ब्रम्ह दृष्टीने बघितल्यववर आपला भले कितीही पराभव होत असतांना दिसला तरी देखील आपण विश्वास न सोडता एक मंत्र जपला पाहिजे सत्य आहे तिथेच तेज आहे. तिथेच एक परमेश्वर आहे. त्याच्या साक्षात्काराचा एकच मार्ग आहे. एकच साधन अहिंसा आहे. त्याला कधीच सोडणार नाही.'८ गांधीजी मानत होते की, पूर्ण अहिंसकाच्या सानिध्यात हिंसा टिकूच शकत नाही, जर आपल्या सहकाऱ्यामध्ये हिंसा असेल तर ती खरेतर आपल्या मध्येच असलेल्या हिंसेमुळे आहे.

'ही व्यक्तीगत स्तरावर अहिंसेच्या प्रतिष्ठेची अवस्था आहे. गांधीजींनी अहिंसेला नविन दृष्टीकोन दिले आहेत. त्यांनी अहिंसेला व्यावहारिक स्वरूपाची व्याख्या केली आणि ही व्याख्या प्राचीन संदर्भात अतिशय क्रांतीकारी आहे. गांधीजींनी अहिंसेच्या परंपरागत कल्पनेला मान्य न करता तिला नवीन प्रकाश दिला आहे, जो विचारणीय तर आहेच. गांधीजींनी या गोष्टीवर 'जोर दिला आहे की त्यांची अहिंसा पुस्तकी गोष्ट रुप नाही, तो जीवनाचा नियम आहे. प्रत्येक कामात ती व्यक्त झाली पाहिजे.'९ अहिंसेचे पूर्णपणे पालन शरीर असतांना होऊच शकत नाही. इच्छा असून देखील किंवा आपल्या नकळत, आपल्या चालण्या, फिरण्यातून, उभे राहण्यातून, श्वास रोखण्यातून, खाणे-पिणे यामूळे शेकडो सूक्ष्म जीवन चिरडले जातात, नष्ट होतात.

अशा प्रकारे संघटित अहिंसेचा वापर करणे त्यांची उपयुक्तता पटवून देणे हेच म. गांधीजींचे जीवनाचे ध्येय होते. त्यांची जीवन निष्ठा होते. ते आपल्या जीवनाचा हेतूच सत्य व अहिंसेसाठी जगणे व मरणे समजत. अहिंसेचा वापर समाजातील न्यायासाठी करणे आवश्यक आहे . हेच साधन  सत्याग्रहाचे युद्ध शस्त्र  आहे. गांधीजींनी युद्धाची अतिशय नैतिक प्रतिमा जगासमोर ठेवली आहे. गांधीजींची अहिंसा ही भित्र्यांची अहिंसा नव्हती. त्याचा एक दृष्टीकोन असा देखील आहे की जर आपण अहिंसक होऊ शकलो नाही तर हिंसक तरी व्हावे, परंतु भित्रे भ्याड किंवा पळपुटे कधीही बनू नये.

अहिंसा निर्भयपणाची श्रेष्ठ आवस्था आहे. गांधीजी याला वीरतेची उच्चतम सीमा मानतात. भित्रेपणाला गांधीजी सुक्ष्म आणि भीषण प्रकारची हिंसा मानतात. त्यामुळे भित्रेपणाला मानवतेचा निषेध मानतात. त्यासाठी ते लोकांना सैन्यामध्ये भरती होण्याचा शस्त्रविदया शिकण्याचा, युद्ध करण्यचा आग्रह करण्यामध्ये देखील संकोच मानत नाहीत, आणि स्वतः युद्धामध्ये सामील होवून जखमींची सेवा करतात.

गांधीजी मानतात की मारन्यापेक्षा मरण्याचा धर्म अवघड (कठीण) आहे. शत्रुला मरताना मारणे सापे आहे. कारण की त्यावेळी त्या प्रसंगानुसार माणूस प्रतिहिंसेच्या प्रचंड पाशविक भावनेने कार्य करतो. परंतु विरोधकाविषयी त्याच्या मनात दया आणि प्रेमाची भावना ठेवून, स्वतः कष्ट (त्रास) सहन करून मरणे अतिशय कठीण आहे. ही अतिशय उच्च प्रतीची आत्मशक्ती आहे. प्रचंड आत्मशक्ती असणाराच अहिंसक असु शकतो. या आत्मशक्तीसाठी अनेक व्रतांची साधना करावी लागते. त्याग आणि तप याचे रूपांतर अहिंसेमध्ये होते. गांधीजी अहिंसेचे संघटन आणि त्याच्या उपयोगाला भारताची जगासाठी एक मोठी (महान) देणगी मानतात. ते असे देखील मानतात की जर हिंदुस्थान जगाला अहिंसेचा संदेश देऊ शकला नसता तर जगामधील होणारी मोठी बरबादी थांबु शकली नसती आणि आता तर त्यांचे रूप विस्तृतच झाले असते. ते म्हणतात, 'जग युद्धाच्या शापापासून वाचु इच्छीते, परंतु कसे वाचावे हेच त्याला कळत नाही. ही किल्ली हिंदुस्थानच्या हाता आहे.' १०

**सारांश**

भारतीय ज्ञान परंपरेत प्राचीन अहिंसा ही एका वृक्षा प्रमाणे प्रसारित होतांना दिसते. तीच अहिंसा पुढे आधुनिक काळात एका वेगळ्या समस्येसोबत आंदोलनाचे एक प्रभावी साधन म्हणून उदयाला येते. प्राचीन काळातील उद्देशापेक्षा वेगळा उद्देश घेऊन म्हणजे अन्याया विरुद्ध प्रभावीपणे उपयोगात आणण्याचे काम महात्मा गांधीजींनी केल्याचे एकंदरीत समजून येते. त्यांच्याच मतानुसार अहिंसा ही भारतीयांची जगाला देन आहे. जी भारतीय संस्कृतचा एक अविभाज्य भाग म्हणून विकास पावली आहे. आज जागतिक संघटना या तत्वाचे पालन करण्याचे नियम तयार करून ते अंमलात आणत आहेत.

**संदर्भ सुची**


१. डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन, अनु. नरेंद्र बोखारे , धम्मपद , बार्टी ,पुणे-२०१५ पृ.३५ .
२. कित्ता , पृ. ३६
३. हिन्दी नवजीवन – २६-१२-१९२४ .
४. हरिजन जनसेवक – १०-११-१९३३ .
५. कित्ता , २३-०६-१९४६ .
६. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर , घनश्याम तळवट कर , प्राचार्य म.भी.चिटणीस , शां.शं.रेगे, बुद्ध आणि त्यांचा धम्म, धम्म सासन विश्व विद्यापीठ पब्लिकेशन्स ,चंद्रपूर -१९९७ पृ. २६६ .
७. महात्मा गांधी, गांधी साहित्य, सस्ता साहित्य मंडल , नवी दिल्ली – १९५० पृ.१२३ .
८. कित्ता , पृ. १२३.
९. महात्मा गांधी ,संपा. श्रीरामनाथ सुमन , अहिंसा और सत्य ,उत्तर प्रदेश गांधी स्मारक निधी, वाराणशी – १९६५ ,पृ . १५ .
१०. हरिजन सेवक – २९-०६-१९४०.